महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
## प्रेसनोट

CB 73/2025

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २३/१२/२०२५ |
|---|---|

**''वेश्याव्यवसायातुन ०१ बांगलादेशी अल्पवयीन पिडीत मुलगी व ०६ पिडीत महिला (त्यापैकी ०२ बांगलादेशी) महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक २१/१२/२०२५ रोजी त्याचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,''तळोजा एम.आय.डी.सी. येथील **हॉटेल नवनाथ इन** या लॉजिंगचा मॅनेजर हा लॉजमध्ये ग्राहकाकडुन २०००/— रूपये घेवुन लॉजमधील रूममध्ये ठेवलेल्या महिला दाखवुन, त्या महिलांकडुन वेश्या व्यवसाय करून घेत आहे.''

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास हॉटेल नवनाथ इन या लॉजिंग मध्ये पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी ०१ अल्पवयीन बांगलादेशी मुलगी व ६ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मालक वसंत शेटटी, लॉज मॅनेजर गिरीश शेटटी, सर्व्हिस बॉय रोशन यादव यांनी अल्पवयीन मुलीस व पिडीत महिलांना प्राप्त करून त्यांना लॉजमध्ये ठेवल्या. सर्व्हिस बॉय रोशन याने त्यांना बनावट ग्राहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबादला म्हणुन २०००/— रूपये बनावट ग्राहकाकडुन स्विकारले. आरोपी (१) वसंत गणेश शेटटी (लॉज मालक) (२) गिरीश विठठल शेटटी (लॉज मॅनेजर) (३) रोशन रामजित यादव (सर्व्हिस बॉय) यांनी आपसात संगनमत करून ०१ अल्पवयीन बांगलादेशी मुलगी व ०६ महिला पैकी ०२ बांगलादेशी पिडीत महिलांना वेश्या व्यवसायाकरीता प्राप्त करून नमुद लॉजचा वेश्याव्यवसायासाठी वापर केला. म्हणून वरील ३ आरोपी विरूध्द भा.न्या.सं.कलम १४३ (३), १४३ (४), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम १९५६ कलम ३, ४, ५, सह POCSO कलम ४, ८, १२ अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास तळोजा पोलीस ठाणे करत आहे.

सदरची कारवाई सहा.पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/पृथ्वीराज घोरपडे, पोहवा/१३२ मांडोळे, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३२३९ पारासुर, पोशि/३४५२ कोलते, पोहवा/२५०४ सविता म्हात्रे, पोहवा/२५०७ मनिषा पावडे, चालक पोहवा/हाडे यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★


Navnath Inn